महाराष्ट्र शासन

क्र. एसटीसी २२८६/३१३/८६/मुंबई-दोन/
माशि-४

शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : १८ जुलै, १९८६.

प्रति,

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय:= १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून मंदार एज्युकेशन सोसायटी; पेढांबे ता. चिपळूण जि. रत्नागिरी या संस्थेत अध्यापक विद्यालय [बी. एड. कॉलेज] विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासंबंधी..

महोदय,

१. कृपया, संदर्भाकरिता आपणाकडील क्रमांक: एसएफ/रिकॉग/२३१६[१९८६] दिनांक २५.२.१९८६ चे वरील विषयाचे पत्र पहावे.

२. संबंधित संस्थेला १९८६-८७ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अध्यापक महाविद्यालय [बी. एड. कॉलेज] सुरु करण्यास शासकीय संमती घोषितकरण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३ [४] व [५] अन्वये करावयाची कार्यवाही मुंबई विद्यापीठाने करावी अशी विनंती आहे.

४. वरील संमती ही पुढील अटी/शर्तीवर देण्यात येत आहे:-

१] वरील संमती ही प्रथम १९८६-८७ या वर्षाकरिता मर्यादित आहे. संबंधित महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहे. ए या प्रस्तावाच्या संबंधात संलग्नीकरणाबाबत मुंबई विद्यापीठाकडून सविस्तर प्रस्ताव आल्यावर त्या संदर्भात आदेश. निर्गमित करण्यात येतील.

२] संबंधित महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाच्या संदर्भात मुंबई विद्यापीठ ज्या अटी व शर्ती विहित करील, त्याची पूर्तता करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

(2)

३] शासनाकडून प्रस्तावित अध्यापक महाविद्यालयाला कोणत्याही प्रकारचे अनुदान देय राहणार नाही.

४] या अभ्यासक्रमात मुंबई विद्यापीठ ज्या अटी/शर्तींवर प्रवेश देण्यास संमती देईल त्यास अनुसरुन प्रवेश देणे संबंधित संस्थेवर बंधनकारक आहे.

५] या महाविद्यालयाप्रित्यर्थ जमा होणारी रक्कम व खर्च होणारी रक्कम यांचे हिशेब, हिशेब तपासणीसाकडून वेळोवेळी तपासून घेणे बंधनकारक आहे. जेव्हा जेव्हा शासकीय अधिकारी अगर विद्यापीठाचे अधिकारी सदर हिशेब व संबंधित कागदपत्रे निरिक्षणासाठी मागतील त्या त्या वेळी सदर हिशेब व कागदपत्रे परिक्षणासाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

५. मुंबई विद्यापीठाने १९८६-८७ या शैक्षणिक वर्षी ८० प्रवेशक्षमता असलेला बी.एड. अभ्यासक्रमाचा एक वर्ग सुरु करण्यास प्रथम तात्पुरत्या स्वरुपाची संमती द्यावी अशी विनंती आहे. सदर संमती ही संलग्नीकरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ ना० प० पाटील ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२] शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.

३] शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

४] विभागीय प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, मुंबई, पुणे, रत्नागिरी, औरंगाबाद, कोल्हापूर.

५] सचिव, मंदार एज्युकेशन सोसायटी, पेढांबे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी.
यांना कळविण्यात येते की, महाविद्यालय सुरु करण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद ३, ४, ५ मधील अटींवर देण्यात आली आहे.

६] शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.

७] शिक्षण व सेवायोजन विभाग [विशि-२]

८] निवड नस्ती/माशि-१